# Answers Paper-2

## विभाग 1 : गदय

### पठीत गदय

**प्र. 1. (अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. पुढील संजाल पूर्ण करा :** 2

पिशवीतील कोणत्याही चार वस्तू

- अभिषेक
- सुमित
- स्नेहल
- रेखामावशी

5. पावडेकाका

**2. आकृती पूर्ण करा :** 2

i) रेखामावशींच्या पावलांची वैशिष्ट्ये

- पायाला चिरण्या पडलेल्या
- धूळ बसून काळया झालेल्या चिरण्या

ii) पावडेकाकांच्या पावलांची वैशिष्ट्ये

- लोण्यासारखा गोजिरा, गुलाबी तळवा
- तळव्याला कुठेही चिरण्या नाहीत

**3. संगणक - काळाची गरज, याविषयी तुमचे मत लिहा.** 3

**उत्तर :** आजच्या विज्ञान तंत्रज्ञाच्या युगात संगणक हा काळाची गरज बनला आहे. आज असे एकही क्षेत्र नाही की जिथे संगणकचा वापर होत नाही. संगणकाला ज्ञानाचे भंडार म्हटले जाते कारण आपल्याला हवी असलेली माहिती त्वरित उपलब्ध होते मग ती कोणत्याही क्षेत्रातली असुदे. संगणकामुळे जग अगदी जवळ आले आहे. आज संगणकाने माणसाचे सारे जीवनच व्यापून टाकले आहे. पोस्ट सेवा, बँका आणि विविध कार्यालयांतील सर्व कामे आता संगणकाद्वारेच घरबसल्या करता येतात. बँकांमधील खात्यासंबंधी माहिती, विमाने-चित्रपट तिकिटांचे आरक्षण, महत्वाच्या परीक्षा, नोकरीसाठी अर्ज, मुलाखात यांसारखी कामे संगणकाद्वारे होतात; इतकेच नाही तर जीवनसाथी देखील संगणकाच्या सहाय्याने शोधू शकतात. अशा रीतीने दैनंदिन जीवनात पदोपदी संगणक आपल्याला उपयोगी पडत असल्याने संगणक एक काळाची गरज आहे.

**प्र. 1. (आ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. हे केव्हा घडले ते लिहा :** 2

i) लेखक घरात एका कोप-यात जाऊन रडत बसायचे .......

**उत्तर :** जेव्हा लेखकाच्या दिवसभराच्या तक्रारी आईच्या कानावर पडायच्या तेव्हा आईकडून धम्मकलाडू व चापटपोळयांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा. म्हणजेच मार पडल्यावर लेखक घरात कोप-यात जाऊन रडत बसायचे.

ii) लेखकांना हेवा वाटायचा .......

**उत्तर :** जेव्हा लेखकाच्या वडिलांना खेळणी विकत घेणे शक्य नव्हते तेव्हा दुस-या मुलांच्या हातातील खेळणी पाहून लेखकाला मुलांचा हेवा वाटायचा.

**2. प्रत्येकी एक उदाहरण लिहा :** 2

i) बालपणीचा लेखकाचा खोडकरपणा -

**उत्तर :** कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे, कै-या, पेरू पाहून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे.

ii) बालपणीचा लेखकाचा उपद्व्याप -

**उत्तर :** घरात जळण्यासाठी आणलेल्या लाकडांतूनच बॅट व स्टंप तयार करून कुठून तरी जुनापुराणा बॉल पैदा करून क्रिकेट खेळणे.

**3. तुमच्या मते लेखकाच्या मनात क्रिकेटचे बीज कसे रुजले असावे ते लिहा.** 3

**उत्तर :** लहाणपणापासूनच लेखकांना क्रिकेटची आवड होती. त्यासाठी ते घरात जळण्यासाठी आणलेल्या लाकडातून बॅट व स्टंप तयार करीत असत. शाळा सुटल्यावर ते सरळ ग्राऊंडवर जात. यावरून त्यांना खेळाची ओढ होती. तिथे ते बॉल टाकण्याचे काम करीत, त्यातून त्यांना प्रेरणा मिळाली. वडिलांनी त्यांना एक जुनी बॅट देखील आणून दिली होती. नंतर एकदा पुना क्लबच्या ग्राऊंडवर जो ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेस व वाय. एम. सी. ए. या दोन संघादरम्यान जो क्रिकेट सामना झाला, तो त्यांनी झाडावर चढून पाहिला. सामन्यानंतर खेळाडूंच्या स्वाक्षरीसाठी जी गर्दी झाली ती पाहून लेखकालाही वाटू लागले की आपणही असे मोठे खेळाडू झालो तर आपल्यामागेही अशीच गर्दी होईल. लेखक वर्गात क्रिकेटची स्वप्ने पाहू लागले. यातूनच क्रिकेटचे बीज रूजले गेले.

## अपठीत गदय

**प्र. 1. (इ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. खालील गोष्टींना लेखकांनी दिलेले महत्त्व लिहून चौकट पूर्ण करा :** 2

i) राष्ट्र महान होण्यासाठी दोन महत्वाचे घटक -

**उत्तर :** नागरिकांचा मानसिक व नैतिक विकास.

ii) शिक्षकाची जबाबदारी अधिक महत्वाची का?

Genius JEE NEET CET FOUNDATION Institute

**उत्तर :** शिक्षक देशाचे भावी नागरिक तयार करत असतो. शिक्षक विदयार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक व नैतिक विकास घडवीत असतात. त्यामुळे सैनिक तयार होतात् हे शिक्षकांनी अहिंसक मार्गाने सिद्ध केले आहे.

**2. 'शिक्षक एक आदर्श व्यक्तिमत्त्व' या विधानाबाबत तुमचे मत मांडा :** 2

**उत्तर :** माणसाच्या आयुष्यात त्याच्या जडणघडणीत शिक्षकांचा फार मोठा वाटा असतो. माझ्या जीवनात शिक्षकांचे फार मोठे योगदान आहे. शिक्षकांमुळेच मी शिस्तबद्ध बनलो. वाचनाची व व्यायामाची आवड निर्माण झाली. चांगले छंद व चांगले मित्र शिक्षकांमुळेच जोडू शकलो. जगाचे ज्ञान व व्यवहारज्ञान आणि संस्कार माझ्या जीवनात आले ते शिक्षकांमुळेचे. म्हणूनच मला शिक्षक म्हणजे परमेश्वरच आहे असे वाटते. म्हणूनच 'शिक्षक एक आदर्श व्यक्तिमत्त्व' वाटते.

## विभाग 2 : पदय

**प्र. 2. (अ) पुढील पदयउतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :**

**1. खालील चौकटी पूर्ण करा :** 2

i) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी - चकोर पक्षी

ii) पिलांना सुरक्षितता देणारे - पक्षिणीचे पंख

iii) चिरकाल टिकणारा आनंद - स्वानंदतृप्ती

iv) व्यक्तीला सदैव सुख देणारा - योगी पुरूष

**2. एका वाक्यात उत्तरे लिहा :** 2

I) चकोर पक्ष्याबद्दल कोणती कल्पना आहे?

**उत्तर :** चकोर पक्षी हा चंद्रकिरणे पिऊन जगतो, अशी कल्पना आहे.

ii) योगी पुरूषाचे सर्वांशी वागणे कशा प्रकारे असते?

**उत्तर :** योगी पुरूषाचे सर्वांशी वागणे मृदू म्हणजे सगळयांना समजून घेणारे असते.

**3. योगीपुरूष व पाणी यांच्यातील फरक स्पष्ट करा :** 2

| योगीपुरूष | पाणी |
|---|---|
| सबाहय निर्मळ करतो | वरवरचा मळ धुते |
| स्वानंदतृप्ती देतो | तहान शमवणारे क्षणाचे सुख देते |
| सर्व इंद्रियांना शांत करतो | फक्त जिभेला तृप्त करते |
| आत्मज्ञानाने उद्धार करतो | फक्त अन्नदान करते |

**4. 'जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।' या ओळीतून तुम्हाला समजलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा :** **2**

**उत्तर :** 'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगात संत एकनाथ यांनी योगी पुरूष आणि पाण्याची तुलाना केली आहे. योगी पुरूष हा पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे. हे विविध दृष्टान्तांतून स्पष्ट केले आहे.

पाण्याने आंघोळ केली तर शरीराचा मळ नष्ट होतो; पण योग्याच्या उपदेशात न्हाऊन निघालात तर मनातलाही मळ जातो. मनातल मळ म्हणजे अविचार. मनुष्य सबाहय निर्मळ होतो.

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

**प्र. 2. (आ) पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेवर त्याखाली दिलेल्या मुददयांच्या आधारे कृती सोडवा :** **8**

**रंग मजेचे रंग उदयाचे**

1. प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री - अंजली कुलकर्णी

2. प्रस्तुत कवितेचा विषय - पर्यावरणाची जोपासना

3. प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा - संगणक युग जरी आले तरी संगणक आपल्याला खायला अन्न देत नाही. म्हणून जी 'काळी आई' म्हणजे धनधान्य देणारी शेते आपण जगवूया. जे मातीमध्ये काबाडकष्ट करून धान्य पिकवतात त्या हातांना आपण पाठवळ देऊया, त्यांच्या पाठीशी उभे राहूया. त्यांना सहकार्य करूया.

4. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश - जागतिकीकरणाच्या या काळात संगणकयुग अवतरलेले असले तरी माणसाचा मातीशी असलेला जिव्हाळ्याचा संबंध तुटता कामा नये. पर्यावरणाची जोपासना केली तर माणसाला कधीच काही कमी पडणार नाही. निसर्गसौंदर्याच्या विलोभनीय आविष्कारात जगण्याचा खराखुरा आनंदही मिळेल असा दृष्टिकोन कवयित्री ने या कवितेत मांडला आहे. पर्यावरणाची काळजी घेतली तर माणूस समृद्ध होईल.

5. प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा - i) ताटवे - गुच्छ ii) वृष्टी - पावसाचा वर्षाव
iii) छत्र - छप्पर, सावली iv) संगत - सोबत

**दोन दिवस**

1. प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री - नारायण सुर्वे

2. प्रस्तुत कवितेचा विषय - मानवी जीवनाची वास्तव परिस्थिती

3. प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा - प्रस्तुत ओळीत कवी नारायण सुर्वे कामगाराच्या आयुष्यातील वास्तव परिस्थिती नमूद करतात. या हातांनी मी कष्ट केले. हात म्हणजे माझे कतृत्व हेच माझे सर्वस्व होते; पण ते दारिद्र्याकडे मी तारण ठेवले. गरिबीमुळे, दैन्यामुळे माझी कर्तृत्व पिचून गेले. कधी माझे हात मी आभाळ कवेत घेण्यासाठी अभिमानाने उभारले. कधी माझ्या हातून मान अभिमानाने उंचावेल असे कर्तृत्व घडले.

4. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश - या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी मानवी जीवनाचे वास्तव व दाहक चित्र उभे केले आहे. दोन दिवस सुख शोधण्यात गेले आणि दोन दिवस दु:खात गेले. पोटाची भूक भागवण्यात संपूर्ण आयुष्य गेले. सोबत केवळ अश्रू राहिले. पण हे सत्य मांडताना जगाच्या शाळेत दु:ख पचवून जगण्याची शिकवण आपल्याला मिळाल्याचे ते सूचित करतात.

5. प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा - i) बरबाद - नष्ट, नाश ii) डोईवर - डोक्यावर
iii) जिंदगी - जीवन, आयुष्य iv) पोलाद - लोखंड

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. 3. पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : 6**

**1. 'निसर्ग हा मोठा जादूगार आहे', हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात कसे लागू पडते, हे 'जगणं कॅक्टसचं' या पाठाच्या आधारे सविस्तर लिहा.**

Genius
JEE NEET CET FOUNDATION Institute

**उत्तर :** जीवसृष्टी फुलण्यासाठी, वहरण्यासाठी पाणी, सुपीक जमीन, ओलावा यांची गरज असते; पण वाळवंटी प्रदेशात अशी परिस्थिती नसते. पाण्याची उणीव, कोरडेपणा, रेताड जमीन ही वाळवंटी प्रदेशाची वैशिष्ट्ये; मात्र अशा कठिण नैसर्गिक स्थितीतही निसर्गाने या ठिकाणी टिकून राहतील अशा वनस्पती आणि प्राणी निर्माण केले आहेत.

वाळवंटी प्रदेशात वर्षातून एखादाच पाऊस पडतो. कधी तर दोन–दोन, तीन–तीन वर्षे पावसाचा ठिकाणा नसतो. अवर्षणाच्या या प्रदीर्घ काळात हा प्रदेश अतिशय वैराण व रुक्ष दिसतो. तेथे जी काय झाडे व झुडपे असतील त्यावर त्या काळात एकही पान असत नाही. जीवन सुकून सुकून निष्प्राण झाल्या सारखे वाटते. मग एक दिवस पाऊस पडतो आणि एखादी जादू व्हावी त्या प्रमाणे झाडाझुडपांना पालवी फुटते आणि जमिनीत दीर्घ काळ सुप्तावस्थेत पडून राहिलेल्या बियांमधून रोपे वर येतात. पाहता पाहता या रोपांवर भरगच्च फुले फुलतात. इतके दिवस ओसाड पडलेला भूप्रदेश पानाफुलांच्या हिरव्या, पिवळ्या, लाल रंगांनी एखाद्या बगिच्या सारखा चित्रमय दिसू लागतो. अशाप्रकारे, निसर्ग हा फार मोठा जादूगार आहे हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात लागू पडते हे या पाठाच्या आधारे स्पष्ट होते.

**2. व्युत्पत्ती कोश :** एखादया शब्दाचा अर्थ जाणून घेण्यासाठी आपण व्युत्पत्ती कोशाची मदत घेतो. या कोशात आपल्याला मूळ शब्द कुठे आणि केव्हा निर्माण झाला आहे हे कळते. तसेच इतर भाषांमध्ये तो शब्द कसा आला आहे व कोणत्या रूपात आहे हे देखिल कळते. **1938** मध्ये मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. सावरकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव संमेलनात मंजूर करण्यात आला. या संपादनाची जबाबदारी कृ. पां. कुलकर्णी यांच्यावर सोपवण्यात आली. बॅ. मुकुंदराव जयकर यांनी अर्थसाय्य केले व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे त्यास मदत झाली. **1946** साली मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले.

**3. टीप लिहा : डॉ. होमी भाभा.**

**उत्तर :** डॉ. होमी भाभा हे प्रख्यात अणुशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारतातील अणुसंशोधनचा पाया घातला. त्यांच्या या कार्याला गौरव

व्हावा यासाठी 'भाभा अटॉमिक रिसर्च सेंटर' या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले. लेखक डॉ. अनिल काकोडकर यांना भाभा अणुसंशोधन केंद्रात काम करत असताना डॉ. होमी भाभा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रचंड स्फूर्ती देणारे होते. 'आपण काय काम करायचं ते आपणच ठरवलं पाहिजे आणि आपलं काम आपणच निर्माण केलं पाहिजे' हा अतिशय महत्त्वाचा व प्रेरणादायी विचार डॉ. भाभांनी डॉ. काकोडकरांच्या मनात रूजवला.

## विभाग 4 : भाषाभ्यास

**प्र. 4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**1. पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा :** **2**

i) तुम्हांला त्रास होतोय का?

**उत्तर :** प्रश्नार्थी वाक्य

ii) किती गोंडस आहे तुमचे बाळ!

**उत्तर :** उद्गारार्थी वाक्य

**2. कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा :** **2**

i) किती पाऊस पडला हो काल रात्री! (विधानार्थी करा)

**उत्तर :** काल रात्री खूप पाऊस पडला.

ii) आंदोलनात सामील व्हा. (प्रश्नार्थक वाक्य करा)

**उत्तर :** आंदोलनात सामील व्हाल का?

**3. पुढील कोणत्याही दोन वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :** **4**

i) झोकून देणे - पूर्णपणे सहभागी होणे

**वाक्य :** रमेश ने एका प्रकल्पाच्या कामात स्वतःला <u>झोकून दिले</u>.

Genius
JEE NEET CET FOUNDATION Institute

ii) दिशा दाखवणे - योग्य मार्ग दाखवणे

**वाक्य :** गुरू नेहमी आपल्या शिष्याल योग्य <u>दिशा दाखवतात</u>.

iii) डोळे लावून बसणे - सतत वाट पाहणे

**वाक्य :** परदेशात गेलल्या आपल्या मुलाची; तो आईला भेटायला येईल याकडे त्याची आई <u>डोळे लावून बसलेली</u> असते.

**प्र. 4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**1. शब्दसंपत्ती :**

**i) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **1**

(1) निमंत्रण = आमंत्रण (2) कीव = दया

**ii) पुढील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.** **1**

(1) उशिरा x लवकर (2) अमावस्या x पौर्णिमा

**iii) शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.** **1**

गुरे राखणारा - गुराखी

**iv) वचन बदला.** **1**

(1) बायका - बाई (2) पिशवी - पिशव्या

**2. पुढील वाक्ये लेखननियमांनुसार करा :** **2**

i) आजची परिक्षा पद्धती काळवाहये झाली आहे.

**उत्तर :** आजची परीक्षा पद्धती कालबाहय झाली आहे.

ii) कालाच्या प्रवाहाबरोबर जाणे हाच खरा मारग.

**उत्तर :** काळाच्या प्रवाहाबरोबर जाणे हाच खरा मार्ग.

**3. पुढील वाक्यातील विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा :** **2**

i) “समजा, घरातून बाहेर पडताना कुणी विचारले, “कुठे जाता?” मी काय सांगू.

**उत्तर :**

| विरामचिन्हे | नाव |
|---|---|
| , | स्वल्पविराम |
| “ ” | दुहेरी अवतरण चिन्ह |
| ? | प्रश्नचिन्ह |
| . | पूर्णविराम |

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute